# साधनामार्ग प्रकाशित करा, तुमचे परमश्रेष्ठ भाग्य साकार करा

१ ऑक्टोबर, २०१९

आत्मीय वाचकांनो,

आपण एक नवा उंबरठा ओलांडत आहोत आणि पदार्पण करत आहोत ऑक्टोबर महिन्यात — एका अशा महिन्यात की, जो श्रीगुरुमाईंचे श्रीगुरू, बाबा मुक्तानंद यांना समर्पित केला गेला आहे. ऑक्टोबर महिन्याचा उल्लेख आपण प्रेमाने ‘बाबांचा महिना’ असा करतो! शरद पौर्णिमा, ही भारतातील मान्सून ऋतूच्या अखेरीस येणारी पौर्णिमा आहे, जी या महिन्यात, म्हणजेच हिंदू पंचांगानुसार आश्विन महिन्यात येते. सदतीस वर्षांपूर्वी याच दिव्य व मंगलमय दिवशी बाबा मुक्तानंदानी पृथ्वीवरील आपल्या जीवनाच्या दिव्य उद्दिष्टाची पूर्तता करून महासमाधी घेतली. ते अनंत काळासाठी परमचितीमध्ये विलीन झाले. या वर्षी आपण या पावन दिवसाचा सन्मान सौरतिथीनुसार २ ऑक्टोबर रोजी व चांद्रतिथीनुसार १३ ऑक्टोबर रोजी करणार आहोत.

या महिन्यात, आपण बाबाजींच्या अलौकिक जीवनयात्रेचे विशेषरूपाने स्मरण तसेच सन्मान करतो. आपल्या साधनेचे ध्येय साध्य केल्यावर आणि जीवनमुक्त — ते जे आत्मज्ञान प्राप्त करून याच मानवदेहात मुक्त झाले आहेत — झाल्यावर बाबाजींनी सत्याचा शोध घेणाऱ्या साधकांवर आपल्या कल्याणकारी कृपेचा वर्षाव केला, जेणेकरून त्या साधकांनादेखील त्यांचे परमश्रेष्ठ भाग्य साकार करता यावे.

महान संतमहात्मे हे अखिल मानवजातीचे उत्थान करण्यासाठी आपले जीवन जगतात व आपल्या शिकवणी प्रदान करतात. बाबाजी आणि आपल्या श्रीगुरू, गुरुमाई आपल्यासाठी अशी इच्छा बाळगतात की, आपण आपले खरे आत्मस्वरूप जाणावे, आपण ते गहन चिरस्थायी प्रेम जाणावे जे आपल्याला परमात्म्याशी जोडते. ते आपल्यासाठी अशी इच्छा केवळ बाळगतच नाहीत, तर ते आपल्याला हेदेखील शिकवतात की, आपण *कशा रितीने* परमात्म्याला जाणू शकतो आणि त्याच्याशी अनुसंधान साधू शकतो. हे आपले महान सद्भाग्यच आहे की, अशा अमर्याद, अगाध कृपेचा आणि करुणेचा लाभ आपणास झाला आहे.

पंधराव्या शतकातील संतकवी कबीर म्हणतात :

> हरि कृपा तब जानिए दे मानव अवतार।
> गुरुकृपा तब जानिए मुक्त करे संसार॥
>
> हे जाणून घ्या की, मानवजन्म हरिकृपेनेच प्राप्त होतो.
> हे जाणून घ्या की, या जगात जन्ममरणाच्या फेऱ्यातून तुमची सुटका श्रीगुरूंच्या कृपेनेच होते.[१]

***

सिद्धयोग मार्गावर आपल्यापैकी बहुसंख्य लोक अनेक रूपांत बाबांचा हा महिना साजरा करतात; यातील एक मार्ग आहे, बाबाजींच्या महासमाधीप्रित्यर्थ दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या शक्तिपात ध्यानशिबीरात सहभागी होणे. श्रीगुरुमाईंच्या कल्याणकारी संकल्पाच्या माध्यमातून शक्तिपात ध्यानशिबीरात आध्यात्मिक शक्तीची जागृती होते, आणि ही जागृती प्रत्येक साधकासाठी त्याच्या जीवनातील एक रूपांतरणकारी घटना असते. प्रत्येक वेळी आपण जेव्हा ध्यानशिबीरात सहभागी होतो, तेव्हा आपल्याला स्वतःच्या आत्मस्वरूपाची अधिक सखोल समज प्राप्त होते आणि यामुळे आपल्या साधनेत प्रगती होण्यास मदत होते.

या वर्षीच्या ध्यानशिबीराचे शीर्षक आहे *मन की शक्ति — मातृकाशक्ति* आणि हे ध्यानशिबीर जगभरातील अनेक ठिकाणी सर्वप्रथम १९ किंवा २० ऑक्टोबर रोजी आयोजित केले जाईल. याविषयी अधिक माहितीसाठी सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटला भेट द्या.

***

या वर्षाच्या आरंभापासून आपण गुरुमाईंचा वर्ष २०१९चा नववर्ष संदेशाच्या आणि ‘मधुर सरप्राईज् २०१९’मध्ये त्यांनी आपल्याला दिलेल्या शिकवणींच्या अभ्यासात स्वतःला निमग्न केले आहे. प्रत्येक महिन्यात, आपण यांपैकी एका शिकवणीवर लक्ष केंद्रित केले आहे. ऑक्टोबर महिन्यासाठी हे पत्र लिहिण्याची तयारी मी जेव्हा करत होते, तेव्हा एक विशिष्ट शिकवण मला प्रकर्षाने आठवत राहिली. मला खूपच कुतूहल वाटले — हे असे का घडते आहे? मग माझ्या लक्षात आले की, मला त्या शिकवणीचे स्मरण यासाठी करवून देण्यात येते आहे की, माझ्या स्वतःच्या साधनेमध्ये तिचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. याबद्दल मी मे महिन्यातील पत्रातून पूर्वी जरी बोलले असले, तरीही याचा उल्लेख पुन्हा एकदा मला करावासा वाटतो आहे. माझ्या मते, ती शिकवण याचे समर्थन करते की,

गुरुमाईंच्या संदेशावरील अध्ययन करत असताना आपण या वर्षीच्या अखेरच्या महिन्यांमध्ये त्या शिकवणीवर अधिक चिंतन करणे आवश्यक आहे.

श्रीगुरुमाई त्यांच्या प्रवचनातून आपल्याला 'योग्य प्रयत्न' करण्याविषयी आणि आपल्या मनाला आधार देण्यासाठी तो प्रयत्न पुन्हापुन्हा करण्याविषयी मार्गदर्शन करतात, जेणेकरून मन स्वतःच्या प्रकाशाकडे उन्मुख होईल. 'योग्य प्रयत्न' म्हणजे नेमके काय आणि तो प्रयत्न कसा करावा याविषयी गुरुमाई आपल्याला शिकवतात. या शिकवणीवर लक्ष केंद्रित करून जेव्हा मी गुरुमाईंचे प्रवचन पुन्हा एकदा ऐकले आणि मग त्यावर चिंतन केले, तेव्हा एक गोष्ट अगदी स्पष्ट झाली की, साधनेतील प्रगतीसाठी, साधनेचे माझे लक्ष्य साध्य करण्यासाठी 'योग्य प्रयत्न' हा एक महत्त्वाचा घटक आहे. एखाद्या विशिष्ट क्षणी 'योग्य प्रयत्न' करणे म्हणजे नेमके काय हे समजून घेणे आणि आपला आध्यात्मिक शोध फलद्रूप व्हावा यासाठी 'योग्य प्रयत्न' कसा करावा हे शिकून घेणे, माझ्यासाठी खरोखरच आवश्यक आहे.

तुमच्या साधनेमध्ये असे क्षण कधी आले आहेत का, की तुम्ही विचार केला की, "मी इतके प्रयत्न करतो आहे, मी अभ्यास करण्यासाठी अपार कष्ट घेतो आहे. तर मग, माझी प्रगती का होत नाही?" असे अनेक क्षण मला आठवतात जेव्हा मला वाटले होते की, मी माझे अभ्यास अगदी काटेकोरपणे करत असूनदेखील मी तिथेच अडकले आहे. 'मधुर सरप्राइझ्'मधील गुरुमाईंच्या शिकवणीने मला हे शिकवले आहे की योग्य प्रयत्न कसा करावा हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. बऱ्याचदा आपण चुकून *कठोर प्रयत्न* म्हणजेच *योग्य प्रयत्न* असे समजून चालतो. आपण आपल्या साधनेचे लक्ष्य गाठण्यासाठी कराव्या लागणाऱ्या 'योग्य प्रयत्नाचे' स्वरूप आणि त्याचे संपूर्ण महत्त्व समजून घेऊन, मग त्यावर काम केले की, आपण स्वतःच्या मनाशी मैत्री करू शकतो आणि मनाला त्याच्या स्वतःच्या प्रकाशाकडे नेऊ शकतो. या शिकवणीविषयी तुमची समज अधिक सखोल करण्यासाठी तुम्ही 'मधुर सरप्राइझ्'मध्ये पुन्हा एकदा सहभागी होऊ शकता, जो अजूनही वेबसाइटवर उपलब्ध आहे.

***

गुरुमाईंच्या संदेशाचे आपले अध्ययन अधिक सखोलतेने करत असताना सिद्धयोग मार्गाची वेबसाइट अनेक वैशिष्ट्यपूर्ण पोस्ट्स्ची शृंखला प्रस्तुत करत आहे, जेणेकरून आपण त्यांचा आनंद घेऊ शकू आणि त्यांच्याशी संलग्न होऊ शकू. या पोस्ट्स् विशेष उत्सवांविषयी अधिक शिकण्याची एक संधीदेखील आपल्याला उपलब्ध करून देतात. त्यातील काही पोस्ट्स्चा उल्लेख इथे करताना मला आनंद होतो आहे :

- Baba's Mahasamadhi [बाबांची महासमाधी] —बाबांच्या शिकवणींच्या रूपात, त्यांचे दर्शन व प्रज्ञानाच्या रूपात आणि आणखी अनेक रूपांमध्ये कित्येक अद्भुत खजिने तुम्हाला या मिनीसाइटवर आढळून येतील.

- Images of Baba's Moon [बाबांच्या चंद्राची छायाचित्रे] – ही वेबसाइटवरील एक आनंददायी फोटोगॅलरी आहे, जिथे जगभरातील सिद्धयोग्यांनी पाठवलेली कलेकलेने वृद्धिंगत होणाऱ्या चंद्राची आणि बाबांच्या पूर्ण चंद्राची छायाचित्रे प्रदर्शित केली जातात. तुम्ही राहत असलेल्या स्थळावरून तुम्ही घेतलेल्या चंद्राची छायाचित्रे कशा रितीने यामध्ये समाविष्ट करता येतील ते तुम्हाला वेबसाइटवर जाणून घेता येईल.

- Reflections on Gurumayi's Message ['वर्ष २०१९ के लिए श्रीगुरुमाई के सन्देश पर मनन' या नावाने प्रकाशित झालेल्या पोस्ट्स्] — लेखकांनी 'मधुर सरप्राइझ्, २०१९मधून एक शिकवण निवडून तिच्यावर केलेले मनन, ही नवीन मिनीसाइट प्रस्तुत करते.

- विश्वभरातील विविध परंपरांमधून आलेल्या बोधकथा ज्या गुरुमाईंच्या संदेशाच्या आपल्या अध्ययनाला साहाय्यभूत होतात.

- अभ्यासपत्र #३६ — गुरुमाईंच्या संदेशाशी संलग्न होण्यास तुम्हाला साहाय्यभूत असलेल्या अभ्यास-पुस्तिकेच्या मालिकेतील हे अखेरचे अभ्यासपत्र आहे.

- ध्यान-सत्रे जी सप्टेंबरमध्ये समाप्त झाली; तरीदेखील, तुम्ही या वर्षीच्या सत्रांपैकी सर्व सत्रांसाठी किंवा त्यातील कुठल्याही एका सत्रासाठी रजिस्ट्रेशन करू शकता.

या महिन्यात आपण अनेक सणवार साजरे करणार आहोत.

- नवरात्र — देवीच्या या उत्सवास २९ सप्टेंबरला सुरुवात झाली आणि हा उत्सव ६ ऑक्टोबरपर्यंत [भारतात ७ ऑक्टोबरपर्यंत] आहे. श्री मुक्तानंद आश्रमामध्ये नवरात्रीतील प्रत्येक सायंकाळी देवीच्या सन्मानार्थ तिच्या महादुर्गा, महालक्ष्मी आणि महासरस्वती या रूपांमध्ये विशेष पूजा केली जाईल. नवरात्रीनिमित्त वेबसाइटवर अनेक विशेष पोस्ट्स् प्रस्तुत केल्या जातील, ज्यांमध्ये अंतर्भूत आहेत —पूजेचे फोटो, पूजेमध्ये वापरण्यात येणाऱ्या वस्तूंच्या महत्त्वावरील लेख आणि ध्यानम् अर्थात् देवीच्या विविध रूपांवर ध्यान याची रेकॉर्डिंग्ज्. तुम्ही जिथे आहात तिथेच हा उत्सव कसा साजरा करता येईल याविषयी वेबसाइटवर दिलेल्या

माहितीद्वारे जाणून घ्या; उदाहरणार्थ, तुम्ही संकल्प करू शकता तसेच ‘जय देवि आरती’च्या शब्दांशी स्वतःला परिचित करू शकता.

- दसरा —हिंदू पंचांगानुसार आश्विन महिन्याच्या दहाव्या दिवशी म्हणजेच नवरात्रीच्या अखेरीस दसरा हा सण येतो. याला ‘विजयादशमी’ असेही म्हणतात. रामायण या महाकाव्यात प्रभू श्रीरामाने लंकेच्या रणभूमीवर दैत्यराज रावणावर मिळवलेल्या विजयाची कथा सांगितली गेली आहे. अमेरिकेत दसरा हा उत्सव या वर्षी ७ ऑक्टोबरला आणि भारतात ८ ऑक्टोबरला आहे.
- दिवाळी — हा एक दीपोत्सव आहे, रामायणातील प्रतिपादनानुसार दिवाळी हा सण प्रभू श्रीरामाच्या चौदा वर्षांच्या वनवासानंतरच्या अयोध्या या आपल्या राजधानीत झालेल्या पुनरागमनाप्रित्यर्थ साजरा केला जातो. ती अमावस्या होती आणि अयोध्यावासींनी आपल्या परमप्रिय प्रभू श्रीरामाचा मार्ग प्रकाशित करण्यासाठी रस्त्यांवर दीप प्रज्वलित केले होते. हिंदू पंचांगानुसार कार्तिक महिन्यातील अमावस्येला, भारतातील लोक प्रभू श्रीरामाच्या पुनरागमनाचे प्रतीक म्हणून प्रत्येक वर्षी आपल्या घरांमध्ये तसेच बाहेरदेखील दीप प्रज्वलित करतात; ही अमावस्या या वर्षी २७ ऑक्टोबरला आहे. त्याच बरोबर देवी लक्ष्मीला आपल्या घरात येण्यास आवाहन करण्यासाठीही हे दीप प्रज्वलित केले जातात — अगदी तसेच, जसे प्रभू श्रीराम जेव्हा अयोध्येला परतले आणि त्यांनी राजसिंहासन ग्रहण केले, तेव्हा घराघरात सुख-समृद्धी नांदू लागली. दिवाळीची सुरुवात २४ ऑक्टोबरला [भारतात २५ ऑक्टोबरला] गोवत्सपूजनाने होईल आणि तिची सांगता होईल बलीप्रतिपदेला म्हणजे २८ ऑक्टोबरला, उत्तर भारतात हा दिवस भारतीय नववर्ष दिवस म्हणून साजरा केला जातो.

***

भरपूर सणवार असलेल्या या महिन्यात, शक्तिपात ध्यानशिबीरात स्वतःला निमग्न करत असताना आणि ऑक्टोबरच्या या महिन्यातील प्रत्येक सण साजरा करत असताना तुम्ही ‘योग्य प्रयत्न’ करत आहात हे सुनिश्चित करा. तुमचे मन स्वतःच्या तेजोमय प्रकाशाने चमचमत आहे, हे न्याहाळण्याच्या सुमधुर फळाचे तुम्ही रसास्वादन करावे, ही सदिच्छा!

उर्दूमध्ये मी लिहिलेल्या या दोन ओळींनी मी तुमची रजा घेईन. या ओळी एका साधकाच्या जीवनाचे — माझ्या जीवनाचे — वर्णन करतात, श्रीगुरुमाईंची कृपा प्राप्त होण्याआधीचे आणि नंतरचे जीवन;

तसेच साधनामार्गावरील वाटचालीचेही वर्णन करतात. मला असे वाटते की, तुमच्यापैकी अनेकांना आढळले असेल की, हे परिवर्तन तुमच्याबाबतीतही खरे ठरले आहे.

> जो हमारे वजूद से भी अनजान हुआ करते थे,
> आज पूछते हैं पता तेरा हमसे टकरा जाने पर।

> ज्यांना माझ्या अस्तित्वाची जाणीवही नव्हती,
> गुरुमाई, ते आज मला भेटल्यावर तुमच्याविषयी जाणून घेऊ इच्छितात.

आदरपूर्वक,
गरिमा बोरवणकर

---

[१] इंग्रजी भाषांतर © २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.